दरभंग्याला अर्ज करायचा ठरला माझ्या एका मैत्रीणीनें किस्सा ऐकविला ती म्हणाली बिहार मध्यें शहाण्याने जाऊ नये. एकदा तिथे गुरांची साथ होती म्हणून तिच्या नवऱ्याला त्यावर उपाय योजना करण्यासाठीं बोलाविले होते. प्रिंसिपॉल सारख्या उच्च पदावर असलेल्या त्या माणसाचे प्राण ड्रायव्हरच्या प्रसंगावधानें वाचले. महू युनिव्हर्सिटीचे व्हेटर्नरी कॉलेजचे. ते प्रिंसिपॉल होते जबलपूरच्या व्हेटर्नरी कॉलेजला. काय झाले? त्यांच्यावर पाटण्यात विद्यार्थ्यांनी पथराव केला. ते गृहरथ

पळत होते. जवळजवळ 6 फूट उंचीचे, शरीरयष्टी छान असलेले ते पळतात एवढे येणा-या बसवाल्याने पाहिले. पटकन बस थांबवून त्यानां आंत घेतले व बस जास्त वेगानें नेली म्हणून ते वाचले असे त्यांच्या बायकोने सांगितले. आपण बरे की आपले काम बरे. कुणाशीच संपर्क फार ठेवला नाही की झाले. दोन तीन जणांनी जबलपुर किती छान हे पटवून दिले. बिहारची सरकारची सर्व्हिस असल्यामुळें शिवाय ह्यांचे वय झालेले आहे हे लक्षांत घेऊन मी म्हटले आली तर नौकरी घ्यायची. कारण दुसऱ्यांकडे हाथ पसरणे यात किती कमीपणा असतो हे माझ्या एका दिरामुळे मला माहित होते. काहीतरी पेन्शन बसेल असा माझा अंदाज बरोबर ठरला. हे नौकरी वरून निवृत्त झाले त्यावेळी फॅमिली पेन्शन पण शास्त्रीजींमुळे सुरू झाली होती. हयांना नोकरी मिळाली सिलेक्शन झाले व बोलविणे आले त्यावेळी माझे सासरे जे आमच्याजवळ होते ते म्हणाले लगेच जॉईन हो. मी आजारी आहे पण तुम्ही परतायची घाई करू नये. त्यांना उत्तेजन दिले. दरभंग्याला गेले. तसे दरभंगा वाईट नाही असे पत्र आले. इकडे मला दिवस. सासरे म्हातारे. मुले लहान म्हणून हयांच्या बहिणीच्या नवऱ्याला बोलाविले ते आले. पण हिंदी येत नाही इंग्लिशचा पत्ता नाही कुठेच जाता येईना. मीच रिक्षाने जाणे येणे करू लागले. नंतर सासरे पण आजारी पडले. त्यांतच त्यांचा अंत झाला पण मरतांना पुतण्याने सर्व विधी पार पाडावे असे मला सांगून गेले होते. दरभंग्याला तार पाठवून हे येईपर्यंत पुष्कळ वेळ गेला असता म्हणून आताच सर्व उरकावे असे सर्व लोकांचे म्हणणे पडले. फक्त आमचे प्रिन्सिपॉल मात्र हयाच्या विरूध्द होते. ते येई पर्यंत पार्थिव राहू दे असा त्यांचा निर्णय. होय नाही करता त्यांना अग्नि वगैरे देऊन झाला व दुस-या दिवशी हे आले.

---------------------------------------------------------------------------